VOL. 4 NO. 2 Feb. 2018
(UGC Approved Journal No. 63716)

ISSN: 2454-5503
IMPACT FACTOR: 4.197(IIJIF)

# CHRONICLE OF HUMANITIES AND CULTURAL STUDIES


A BIMONTHLY REFEREED INTERNATIONAL JOURNAL

SPECIAL ISSUE

## ON THE OCCASION OF INTERNATIONAL CONFERENCE ON RECENT ADVANCES IN LANGUAGES, LITERATURE AND SOCIAL SCIENCES

17th February, 2018

(Book -13)



*Guest Editor*

**Dr. Digambar B. Rode**

Late Ramesh Warpudkar ACS College
Sonpeth
Pin-431516
Ta.Sonpeth Dist.Parbhani

**Full Journal Title:** Chronicle of Humanities & Cultural Studies(CHCS)
**Print ISSN:** 2454-5503
**UGC Approved Journal No. 63716**
**Impact Factor:** 4.197 (IIJIF)
**Frequency:** Bimonthly / **Language:** Multi language / **Journal Country/Territory:** India
**Publisher:** Centre for Humanities & cultural Studies, A-102, Sanghavi Regency, Sahyadrinagar, Kalyan (W) (MS).
**Subject Categories:** Humanities & Cultural Studies

*Chief Editor :*
**Dr Kalyan Gangarde,** Director, Centre for Humanities and Cultural Studies, Kalyan (W)
*Executive Editor*
**Dr Grishma Khobragade,** Asst. Prof., Birla College, Kalyan (W)
*Co- editors*
**Dr. Sadhana Agrawal,** Asst. Professor, Maharani Laxmibai Govt. College of Excellence, Gwalior (M.P.) India
**Pandurang Barkale,** Asst. Professor, Dept of English, SNDT Women's University, Churchgate, Mumbai
**Bharat Gugane,** Asst. Professor, Bhosala Military College, Nashik, Maharashtra
**Dr. Dashrath Kamble,** Asst. Professor, S.B.College, Shahapur, Dist. Thane, Maharashtra
**Dr. Sachin Bhumbe,** Asst. Professor, P. N. Doshi College, Ghatkopar, Mumbai

## EDITORIAL ADVISORY BOARD

**Aju Mukhopadhyay,**
a poet, author and critic, 8 Cheir Lodi Street, Pondicherry, India.
**Dr R.T. Bedre,**
Principal RSPMS' SPP College, Sirsala, Dist. Beed (MS)
**Dr (Mrs.) Smita R. Nagori,**
Head,PG Department of English, M.U.College Udgir, Dist. Latur, Maharashtra, India. Email: smita.lakhotiya@gmail.com
**Dr Arvind Nawale**
Head, Department of English, Shivaji Mahavidyalaya Udgir, Dist. Latur (Member, BoS in English, Former Member of the Senate, Faculty of Arts, SRTM University, Nanded
**Dr Rajiv Kumar,**
Associate Professor, Dept. of English, S.K.M University, Dumka, Jharkhand
**Dr Kailash Nimbalkar,**
Principal, S.B.College, Shahapur, Dist. Thane, Maharashtra, India. Email: nimbalkar_8@rediffmail.com.
**Tsai-ching Yeh**
Assistant professor, Department of English, National Taipei University of Technology. (Taivan)
**Dr B. N. Gaikwad,**
Vice Principal, N.G. Acharya and D.K. Marathe College of Arts, Commerce and Science , Chembur (East), Mumbai-400071
**Dr Simon Philip,**
Assistant professor, Department of Social Work, Voorhees College, Vellore
**Dr Binu Anitha Josheph**
Assistant professor, Department of English, Voorhees College, Vellore
**Dr Chandrashekhar Kanase**
Head, Department of Dramatics, SPP College, Sirsala, Dist Beed (MS)

## EDITORIAL BOARD

**Dr Mahendra Shinde,** Associate Professor and Head, Department of English, N.M. Sailu, Dist. Parbhani, Maharashtra, India.
**Dr Ramkishan Bhise,** Assistant Professor, SIES Graduate School of Technology, Nerul, Navi Mumbai
**Dr Asish Gupta,** Asst. Professor, J. H. Govt. P. G. College, Betul MP.

| Subscription Rates | | |
|---|---|---|
| | Annual membership (Individual) | Rs. 1,800 (150 $ for foreigners) ( Six Issues ) |
| | Bi-annual Membership | Rs. 3,500 (250 $ for foreigners) |
| | Institutional annual membership | Rs. 2,200 |
| | Institutional Bi-annual membership | Rs. 4,200 |

*Those interested in making online transactions, the following details may be of use:*

| Bank Name | Account Name | Account Number | IFSC code |
|---|---|---|---|
| Canara Bank **(Branch: New Marine Lines, Mumbai)** | Centre for Humanities & Cultural Studies | 1389101071921 | CNRB0001389 |

*DISCLAIMER: Academic facts, views and opinions published by authors in the Journal express solely the opinions of the respective authors. Authors are responsible for their content, citation of sources and the accuracy of their references and biographies/references. The editorial board or Editor in chief cannot be held responsible for any lacks or possible violations of third parties' rights.*

# CONTENTS


| | | | |
|---|---|---|---|
| 1. | महिला सबलीकरण आणि भारतीय स्त्री साहित्याचा अ... | डॉ. कविता मुरुमकर | |
| 2. | वारकरी संप्रदाय का तत्वज्ञान | डॉ. नवीन निलंगे | |
| 3. | व्यक्ति चित्रणातील रेषा व रंग संहिता | अंबादास चाकरे | |
| 4. | 'देहू ते महू' मधील संत तुकाराम | सखाराम कदम | |
| 5. | नोटवंदी कारणे आणि परिणाम | ज्योती खवाने | |
| 6. | वैवाहिक समस्या आणि समुपदेशनः काळाची गरज | आरती धनवे | |
| 7. | मध्यप्रदेश आदिवासी लोक संस्कृति | डॉ. तबस्सुम खान | |
| 8. | पैक्षिक मनोविज्ञान | ऊषा देवी द्विवेदी | |
| 9. | नक्षलवाद : लोकशाहीपुढील एक आव्हान | डॉ. योगेश वडतकर | |
| 10. | वौध्द पर्यटन स्थळ चैत्यभूमीचे शिल्पकार .. यशवंतराव आंबेडकर | जामकर ए.आर. | |
| 11. | कोरडवाहु फळवाग अभ्यास व चिंतन विशेष संदर्भ - मराठवाडा विभाग | डॉ. डी.एन. शिंगे | |
| 12. | २१ वी सदी के हिंदी के राजनीति केंद्रित उपन्यास | डॉ. बालाजी जोकरे | |
| 13. | ग्रामीण कविता : बदलते संदर्भ | डॉ. चत्रभुज कदम | |
| 14. | दलित एवं आदिवासी कवयित्री के कविताओं में अभिव्यक्त त्रासदी | सुनिल एस. कांबळे | |
| 15. | फ.मुं. शिंदे यांच्या 'जुलूस' कवितेतील परिवर्तनवादी विचार : एक आकलन | डॉ. संजय कसाव | |
| 16. | सहजीवन : एक चिकित्सा | डॉ. भुसारे एस. आर. | |
| 17. | जागतिकीकरणाच्या प्रवाहामध्ये स्वदेशी | रोहिणी खंदारे | |
| 18. | निवडणूक आणि मतदान व्यवहार | संभाजी तांबे | |
| 19. | ऑलिंपिक क्रीडा क्षेत्रातील भारतीय महिला खेळाडुची भुमिका ... | गोविंद वाकनकर | 61 |
| 20. | रोकडविरहीत व्यवहार आणि वँकिंग व्यवस्था | डॉ. परशुराम पाटील | 63 |
| 21. | वर्तमान समाज वास्तव आणि ग्रामीण कविता | डॉ.कैलास इंगळे | 65 |
| 22. | महिला खेळाडू आणि मातृत्व | डॉ. रमेष माने<br>डॉ. छत्रपती पांगरकर | 68 |
| 23. | हिंन्दी सिनेमा में शास्त्रीय संगीत की भुमिका | पल्लवी कुलकर्णी | 70 |
| 24. | संगीत क्षेत्रातील तज्ञांचे सांगितीक योगदान आणि चरित्र | वैशाली एस. चौरपगार (मोहोड) | 73 |
| 25. | स्त्री–विमर्श एवंसशक्तिकरण : दशा एवं दिशा | डॉ. गजेन्द्र सिंह ठाकुर | 77 |
| 26. | जागतिकीकरण आणि शिक्षण | मनिषा सुरासे | 80 |
| 27. | भारतीय स्त्री आणि स्त्रीवाद : नवे आयाम | स्वाती काटे तौर | 82 |
| 28. | **म बसवेश्वर आणि म चक्रधर** | डॉ.शिंदे.आर.डी. | 85 |
| 29. | भारतातील सरोगसी पध्दतीचे स्वरुप व समस्या | परमेश्वर यादव | 87 |
| 30. | **भटक्या-विमुक्त समाजाच्या हुंडा प्रथा** | **डॉ. अतुल चौरे** | 90 |
| 31. | दलितांच्या लोकसाहित्यातील लोकजीवन | डॉ.मेधा गोसावी | 93 |
| 32. | समकालीन मराठी बालसाहित्याचे स्वरूप | आल्हाद बा. भावसार | 96 |
| 33. | ग्रामीण कथाकार प्रा. आप्पासाहेब खोत | डॉ. बालासाहेब काळे | 10 |
| 34. | **स्त्रीवादी चळवळ आणि भारतीय पूर्णवादी नारी फोरम** | **डॉ. भारती नवथर** | 10 |
| 35. | आधुनिक काळातील मराठी सुगम संगीताच्या लोकप्रियतेची .... | सौ. राधिका डांगी | 10 |
| 36. | **विकास की राजनीति और पर्यावरणीय आंदोलन** | **डॉ. चित्रा माली** | 11 |


Late Ramesh Warpudkar ACS College Sonpeth Pin-431516 Ta.Sonpeth Dist.Parbhani

Late Ramesh Warpudkar ACS College
Sonpeth
Pin-431516
Ta.Sonpeth Dist.Parbhani

33.

# ग्रामीण कथाकार प्रा. आप्पासाहेब खोत

डॉ. बालासाहेब मुंजाभाऊ काळे
सहयोगी प्राध्यापक, कै. रमेश वरपुडकर महाविद्यालय, सोनपेठ

ग्रामीण कथाकार म्हणून उभ्या महाराष्ट्राला परिचित असणारे कथाकार म्हणजे प्रा. आप्पासाहेब खोत, ग्रामीण कथा लिहण्या बरोबरच ती कथा, कथन करुन सर्वसामान्य माणसापर्यंत पोहविण्याचे कार्यही त्यांनी केले. कथा कथनकार म्हणून त्यांचा दमदार आवाज आज महाराष्ट्र भर ओळखीचा आहे. व्यंकटेश माडगुळकर वामन होवाळ, शंकर पाटील यांच्या पासून प्रेरणा घेऊन त्यांनी कथाकथन केले. असले तरी त्यांनी स्वतःची एक वेगळी ओळख कथाकथन मध्ये निर्माण केली आहे. ते चौथ्या पिढीतील महत्वाचे ग्रामीण कथाकार सदानंद देशमुख , आनंदराव पाटील, शंकर सखाराम, दादाराव मुसळे, विजय जाधव, नामदेव माळी हे त्यांचे कांही समकालीन कथाकार कथाकार त्यांची कथा मुख्यतः शेतकरी व शेतीभोवीच फिरते.

'गवनेर' हा त्यांचा पहिला कथासंग्रह, महापूर, रानगंगा, कळवंड, माती आणि कागुद या कथासंग्रहा बरोबरच त्यांनी पळसफुल,गावपांढर,गावपांढरीच्या वाटेवर,घरपण,फेसाटी इ. कादंबऱ्या ही लिहील्या आहेत.त्यांच्या अनेक पुस्तकांना पुरस्कारानीही सन्मानीत केले आहे. 'ग.ल. ठोकळ पुरस्कार', 'अचार्य अत्रे साहित्य पुरस्कार', 'महाराष्ट्र शासनाचा उत्कृष्ट साहित्य निर्मिती पुरस्कार', 'वी रघुनाथ साहित्य पुरस्कार' इ. अनेक पुरस्कांनी त्यांना गौरवीत केले आहे. ते 'राष्ट्रीय आदर्श शिक्षक पुरस्कार' प्राप्त विद्यार्थीप्रिय अध्यापक आहेत.

आज ग्रामीण कथालेखन म्हणून ते साहित्यात स्थिर झाले आहेत. ते स्वतः हाडाचे शेतकरी असल्याने ग्रामीण माणसांचे जीवन त्यांनी जवळुन पाहिले आहे, अनुभवले आहे. ग्रामीण माणसांच्या व्यथा वेदनांना त्यांनी आपल्या कथेतून अत्यंत तीव्रपणे मांडले आहे. 'गवनेर' पासून 'माती आणि कागुद' पर्यंत शेतकरी, दारीद्रय,उपासमार, यांचे भयावह चित्र त्यातुन येते. प्रा. चंद्रकुमार नलगे त्या संदर्भात लिहीतात "काळ्या मातीतील जगणं अस्सलपणे येते ते प्रा. आप्पासाहेबांच्या कथांतुन खेडुतांच्या खोल खोल जखमा आपल्याला गलवलुन टाकतात. मायमातीच्या ओलाव्यात काळजातुन मांडतांना त्यांची लेखणी अंतर्याम हालवून टाकते" त्यांच्या कथेचा विशेष सांगताना श्री उत्तम पाटील म्हणतात, 'संवाद हा खोतांच्या कथेचा आत्मा आहे'आणि ते खरे आहे. संवादातुन त्यांची कथा आकार घेत जाते. बऱ्याच वेळेला कथेची सुरुवात आणि शेवट ही संवादातुनच होतो निवेदनापेक्षा संवादावर लेखकाची भिस्त जास्त असते. पात्रांचे स्वभाव दर्शन, संघर्ष, ताणंवाणं व्यक्त करण्यासाठी ते संवादाचा मोठ्या खुबीने वापर करतात.'माती आणि कागुद' मधील शंकर जगपात सोसायटीची उचल, इंरिगेशची पाणीपटी, रासायनीक खते, ऊसाची लागवड या सर्व कात्रीतून हातावर ऊसाचे कोरे बील येते, त्यावेळी ते कोरे बिल पोराकडे फेकुन म्हणतो, "वरीस दीड वरीस चिकुल तुडवून रक्तांच पाणी केलं. रातीचा दिस केला आणि ऊस विकवला आणि ह्या बग हातात काय आलं - धत्तुरा." वर्षभर श्रध्देने राबुनही त्यांचे फळ मिळेलच असे नाही हा इथला विचीत्र न्याय.

खेड्यातील आयुष्ये ही पुर्नताः मातीवर आवलंबुन असलेली. त्यामुळे जगण्यात अस्थिरता आहे. बदलते ग्रामीण वास्तव प्रा. खोताची कथा जागरुकपणे टिपते. आज वाढती बेरोजगारी , व्यसनांची - चैनीची वाढती साधने यामुळे ग्रामीण तरुण दिशाहीन होत आहे, बेजबाबदार वागत आहे. त्यामुळे वडीलधाऱ्या व्यक्तींची कुंचबणा होत आहे. एका बाजुला बेजबाबदार वागणारी पोरं, तर दुसऱ्या बाजूला कर्जात ढकलणारी शेती यामुळे आर्थिक आणि कौटुंबिक पातळीवर आलेले नैराश्य त्यामुळे आज अनेक शेतकरी आत्महत्या करत आहे. यांचे चित्रणही प्रा. खोतांची कथा करते. 'गळफास' कथेतील विलासकाका काटकसरीने जीवन जगणारा माणुस . परंतु मुलगा पंडीत हा अत्यंत विलासी व्याजाने पैसे काढुन डान्सबार मध्ये उधळपटी करतो. त्यामुळे विलासकाळाची झालेली वाताहात 'गळफास' कथेत प्रा. खोतानी प्रभावीपणे मांडली आहे.

संयुक्त कुटूंब पध्दती हे ग्रामीण भागाचे वैशिष्ट, पण आज तिला तडे गेले आहेत. एकसंघ कुटूंबात सण - उत्सव जोरात साजरे होत. सुखदुःखे वाटून घेतली जात. पण आज माणसे संवेदनाहीन बनत चालली आहेत. घराच्या, शेतीच्या वाटण्या होतात हे आपण समजु शकतो पण आज खेड्यात आई - वडीलांच्याही वाटण्या केल्या जात आहेत. 'वाटणी' ही कथा याच वास्तवावर प्रकाश टाकते. जन्मदात्या आई - वडीलांच्या मनाचा विचार न करता आपल्या सोयीसाठी त्यांना वृध्दावस्थेत एकमेंकापासून तोडणाऱ्याचे चित्र या कथेत येते या कथेत ' लिंबाजी' या वृध्दाचे मुलगे त्यांची व पत्नीची वाटणी करतात. ती करतांना ते स्वतःची सोय पाहतात. त्या वृध्द जीवांच्या मनाची पर्वा करत नाहीत. एवढंच नव्हेतर स्वतःतल्या वैयक्तिक भांडणामुळे त्या दोघांना भेटण्यासही मनाई करतात. लिंबाजीला थोरला मुलाच्या जनावराकडे लक्ष देण्यासाठी रानात ठेवल जात तर त्यांच्या वृध्द पत्नीला धाकटा मुलगा आपला लहान मुलांना सांभाळण्यासाठी ठेवून होतो. फुटलेल्या कुटूंबामुळे खेडक्यातील सांस्कृतिकतेला तडे गेल्याचे प्रत्ययकारी चित्रण त्यांच्या कथेत येते.

ग्रामीण भागातील माणसांत येत असलेला कोरडेपणा खोतांच्या लेखनीला अस्वस्थ करतो. नात्यांत निर्माण हो चाललेला दुरावा येत चाललेली शहरी कृत्रिमता पाहून अस्वस्थ होतात. यादृष्टीनेही त्यांच्या कथा पाहाण्यासारख्या आहेत 'घर आणि बंगला' या कथेतील आनंदा आपला भाऊ दाद

ISSN: 2454-5503 Impact Factor: 4.197 (IIJIF)

वहिनीच्या कष्टाने शिकतो. प्राध्यापक होतो. शहरात बंगला बांधतो. स्वतःमजेत जीवन जगतो पण खेड्यात रहाणाऱ्या आपल्या भावाला विसरतो. विहिरीवर मोटार बसविण्यासाठी थोरल्या भावाने पैसे मागितल्यावर बंगल्याच्या कर्जाचे कारण पुढे करून पैसे देण्याचे टाळतो.एवढेच नव्हे तर स्वतःच्या नावाची जमीनही विकायला काढतो. दादा - वहिनीच्या घरातुन निघतांना दानशुरपणाचा आव आणत शंभर रुपयाची नोट वहिनीच्या हातावर ठेवतो. या कथेतील आनंदा हा मातीला विसरणाऱ्या आजच्या 'शहराळलेल्या' पांढरपेशी वर्गाचे प्रतिनीधी आहेत.

प्रा. खोत यांच्या कथेतील स्त्री जाणीवा अभ्यासनीय आहेत. 'स्त्री' ही त्यांच्या साहित्याच्या केंद्रस्थानी आहे. ग्रामीण स्त्रीची विविध रुपे त्यांच्या कथेतुन व्यक्त होतात. अगतिक, जिद्दी, दुर्दैवी, संवेदनशील, कुटूंबवत्सल, सोशिक, बंडखोर अशी स्त्रियांची विविध रुपे त्यांच्या कथातुन आकार घेतात.

'दसऱ्याची कडाकणी' या कथेतील नायिका गिरजा मावशी ही विधवा स्त्री पती विहिरीत सुरंग घालताना स्फोट होऊन मरतो. एकाकी गिरजा मावशी पोराला जिद्दीने शिकवते. पोराला आपल्या हातची कडाकणी आवडते म्हणून कित्येक मैलाची पायपीट करुन त्याला कडाकणी देते. पुढे पोरगा एस. टी. त नोकरीला लागतो.शहरात राहू लागतो आणि आई त्याला परकी वाटु लागते. कुडाच्या झोपडीतील तिचं दरिद्री जगण त्याला उबग आणतं. लग्नही तो आईला न कळवता परस्परच करतो . बायकोला घेऊन उभ्याउभ्या भेटायला येतो. ती ही लांबुनच उभ्याउभ्या नमस्कार करते. गिरजामाशीच्या हातची काडकणी तिला किळसवाणी वाटते. ती झोपडी बाहेर जाते. भाड्याच्या गाडीत जाऊन बसते. वसंताही आईचा कडाकणी खाण्याचा प्रेमळ आग्रह नाकारुन बायकोमागुन जातो. असहाय्य गिरीजा मावशीचे भावविश्व कोलमडुन पडते. तिला तो धक्का सहन होत नाही. ती वेडीच होते. ही कथा शहराळलेल्या , नाती विसरत चाललेल्या तरुणांच्या संकुचित मनोवृत्तीवर प्रकाश टाकते. खेड्यातुन शहरात जाऊन स्थिर झालेला असा एक वर्ग तयार होत आहे की ज्याला खेड्यातील भाषा गावढळ वाटू लागली आहे. सण - उत्सव वेळेचा उपव्यय वाटु लागला आहे. एकूणचं सगळ जगणं खालच्या पातळीवरच वाटू लागलय आजही अशा अनेक गिरजा मावशी खेड्यातुन अगतिक आयुष्य जगत आहेत.

'डव्हाळ' ही ही खोताची एक उल्लेखनीय कथा रंगू ही सासुरवाशी तिला पहिल्यादाच दिवस गेले खर्डा - लोणी खाण्याचे डोहाळे तिला लागले आहेत. पण खास्ट सासुकडून तिची अबाळ होत आहे. केवळ शिळी भाकरी तिच्या वाटेला येते. मजुरीला गेल्यावर मग ती अनावर इच्छेने सोनाबाईची खर्डा - लोणी असलेली भाकरी चोरुन खोत ; पण आपण पाप केलं आहे. याची बोचणी तिच्या मनाला लागते. ती कुढत राहते. शेवटी सोनाबाईला एकांतात गाठुन ती सर्व सांगते. एका वेगळ्या विषयावरती ही कथा दारिद्र्यावर भिषण प्रकाश टाकते. 'चुलीचं लाकुड' मधील लक्ष्मीच जगण ही असच ही गरीबघरची लेक जाऊ श्रीमंताघरची , त्यामुळे घरात तिचीच सत्ता नवरा दबला.त्यामुळे जाऊ दिराचा सासुरवास

'जोनंकार' कथेतील जानुतात्याचा मुलगा घरचा म्हातारा बैल त्यांना विचारात न घेता विकायला काढतो. 'राजा' बैल जानुतात्यांच्या सोबतीने त्यांच्या संसारात राबला . आता तो वृद्ध झाला आहे. जानूता त्याही वृध्द झाले आहेत . त्यांच्या मताला किंमत नाही. तात्या म्हणतात, " व्हय, त्यांर लेका मरता समयाला त्याला कसाबाला कसं द्यायचं रं ? " तेव्हा मुलगा निर्विकारपणे म्हणतो, ' मग काय जाण्यावर किड पडून मरुदे ? त्यापरास चार रुपये येतील.' जानुतात्याला पोराचे हे बोल झोंबतात . आपल्या वृध्दत्वाचीच ही विटबंना आहे असे वाटते ते दुःखी होतात, आणि छपरातुन बाहेर पडता पडता म्हणतात , ' दे बाबा कसावाला कापायला नशीब ! मनून म्हाताऱ्या माणसासनी कसाब कापाया व्हंत व्हंईत, व्हायतर...' या संदर्भात प्रा. चंद्रकुमार नलगे म्हणतात, " कोर्टुंबिक नात्यातील दुरावा चाललेला जिव्हाला, हरवत चालेली माणुसकी यांच प्रत्यकारी चित्र त्याच्या कथांतुन आलेल आहे. अस्सल 'घरपण', आणि 'मातीपण' कसं असावं यांच्याही सूचना करणाऱ्या कथा आहेत. ग्रामीण जीवनातील होणारा कौटुंबिक विस्फोट मनाला चटका लावुन जातो."

माती , भाषा, संस्कृती यांनी नाळ कशी तुटत चालली आहे आणि माणुस कसा भरकटत चालला आहे, नीतिमुल्यांपासून त्यानं फारकत कशी घेतली आहे. सामाजिक - दुर्मंगलपणातील दाहकता याचेही चित्रण त्यांच्या कथेतुन समरसून आलेले आहे. स्वतःचे अस्तीत्व शोधू पहाणारी, वेदनेनं खचलेली , जिद्दीने प्रतिकुल आयुष्याला अव्हान देणारी स्वतःच्या वेदना मुकपणे वाहणारी , आत्मशोध घेणारी अशी विविध माणसे खोतांच्या लेखणीतुन आकार घेतात. सर्वच स्तरातील जीवनदर्शन त्यांच्या लेखणीचे वैशिष्ट्य आहे.

सामाजिक बांधिलकीची जाण त्यांच्या लेखनीला आहे. विकृत होत चालेली ग्रामीण मुल्यव्यवस्था, भौतिक सुबता, दारिद्र्य, राजकारणातुन कथा घेते. त्यांच्या कथेचे सामर्थ्य सांगतांना श्री उत्तम पाटील म्हणतात. "खेड्यातील दुःख दारिद्र्य, उपासमार याचे दर्शन घडविताना त्याची कारण मिसांसा त्यांची कथा करते. या दृष्टीने त्यांची कथा सजण आहे. ग्रामीण वृत्ती प्रवृत्तीवर अचूक भाष्य करणे हा त्यांच्या कथेचा पिंड आहे."

थोडक्यात खोतांची कथा ही नुसतीच किस्सा अथवा घटना नसते. प्रखर सामाजिक जाणीव त्यातुन व्यक्त होतात. जोमदार आशयाच्या असतात. संवादातुन फुलणारी ही कथा पाल्हाळ टाकुन नेमक्या वर्मावर बोट ठेवते. माणसाविषयी तिला प्रचंड आस्था आहे. मानव्यावर विश्वास आहे. ग्रामीण माणसाच्या शोषणाची चीड आहे.मातीतील माणसाविषयी आंतरिक कळवला असणारी ही कथा आहे.

**संदर्भ :**


- गवनेर
- रानगंगा
- माती आणि कागुद
- महापूर
- भू - वेध


□□□

PRINCIPAL
Late Ramesh Warpudkar (ACS)
Sonpeth Dist. Parbhani